# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२ वा ❑ शनिवार दि.०८ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सोन्यानी घेतली मोठी उसळी !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सध्या सोन्या-चांदीची खरेदी करणं सर्वसामान्य ग्राहकांना अवघड झालं आहे. कारण दिवसेंदिवस सोन्या चांदीच्या दरात मोठी वाढ होत आहे. त्यामुळं ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे.दरम्यान, सोन्याच्या दरांनी ८७ हजारांचा ऐतिहासिक आकडा पार केला आहे आणि लवकरच हा आकडा ९० हजारांवर जाईल, असा अंदाज आहे. अचानक सोने महाग का झाले? नुकताच प्रसिद्ध झालेला जागतिक सुवर्ण परिषदेचा अहवाल काय सांगतो? सोन्यात गुंतवणूक करणे फायदेशीर आहे का? आंतरराष्ट्रीय पातळीवर काय स्थिती आहे? सोन्यात अचानक एवढी तेजी का आली ? भारतात लग्नसराई सुरू झाली म्हणून की आणखी काही कारणे आहेत ? काही महिन्यांपूर्वी चीनने आंतरराष्ट्रीय बाजारातून भरमसाट सोने खरेदी केले त्याचे काही कनेक्शन आहे का? की अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प विराजमान झाल्याचा हा परिणाम आहे? असे अनेक प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात.

लग्न सराई, शेअर मार्केटमधील अस्थिरता, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम आणि सराफा बाजारात मागणी वाढल्याने सोन्याचे दर झपाट्याने वाढत आहेत. जानेवारीपासून सोन्याचे दर वाढल्याचंच दिसत आहे. आता सोनं खरेदी करणं आवाक्याबाहेर चाललं आहे.

सोन्याच्या किमतीने विक्रमी उच्चांक गाठण्याचे कारण म्हणजे जागतिक व्यापार युद्धाची भीती. आता गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीकडे धावत आहेत. ट्रम्प यांनी प्रथम मेक्सिको आणि कॅनडावर मोठे कर लादले आणि नंतर त्यावर तात्पुरती बंदी देखील घातली. यामुळे सोन्याबाबतची अनिश्चितता आणखी वाढली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे व्यवसाय जगात अनिश्चितता लक्षणीयरीत्या वाढली आहे.

आर्थिक अनिश्चिततेपासून बचाव करण्यासाठी जगभरातील मध्यवर्ती बँका सोने खरेदी करत आहेत.

चीनच्या मध्यवर्ती बँकेने सलग दुसऱ्या महिन्यात सोन्याच्या साठ्यात वाढ केली आहे.

भारतात लग्नसराईचा हंगाम असल्याने सोन्याच्या दागिन्यांची मागणीही खूप जास्त आहे.

रुपयाचं मूल्य डॉलरच्या तुलनेत दिवसेंदिवस घसरत आहे. १डॉलरचं मूल्य जवळपास ८७ रुपये झालं असताना आता सोन्या चांदीच्या दरांनी नवा उच्चांक गाठला आहे. होळी आधीच सोनं रेकॉर्ड ब्रेक किंमतीवर पोहोचलं आहे.

स्टॉक मार्केटमधील घट आणि गुंतवणुकीच्या सुरक्षित पर्यायांमध्ये सोन्याचा विचार केला जात असल्यामुळे या दरवाढीला अधिक गती आली आहे. ऑल इंडिया सराफा असोसिएशननुसार, दिल्लीत सोन्याचा दर ८५,३००रुपये प्रती १० ग्रॅमवर पोहोचला आहे.

हा दर मागील विक्रमी किमतींनंतरचा नवा उच्चांक आहे. जागतिक पातळीवरील ताणतणाव आणि डॉलरच्या घसरणीमुळे भारतात सोन्याच्या किमतींमध्ये सतत वाढ होत आहे. सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानले जाते, त्यामुळे शेअर मार्केटमधून लोक सोन्या चांदीमध्ये गुंतवणूक करण्याकडे शिफ्ट होत असल्याचंही मागच्या काही काळात दिसून आलं.

केवळ आभूषणांपुरते सोन्याचे मूल्य मर्यादित नाही. प्रतिष्ठेचे ते एक लक्षण आहे. शिवाय सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय आहे. भारतीय मानसिकता ही गुंतवणुकीकडे अधिक असते. मोलमजुरी करणाऱ्यांपासून ते गडगंज श्रीमंतांपर्यंत सारेच सोन्यात सुख शोधत असतात. वेळेप्रसंगी हेच सोने कित्येक पटीने मौल्यवान बनते. आरोग्य, शिक्षण, व्यवसाय किंवा लग्नकार्यासाठी आपले दागिने गहाण ठेवणाऱ्या महिलांचीही उदाहरणे आपण पाहतो. म्हणजेच, सोने खरेदीमुळे दागिना अंगावर मिरवतानाच भविष्यकाळातील संकटासाठीची तरतूदही केलेली असते. गेल्या काही वर्षांत तर अनेक जण शेअर बाजाराऐवजी सोन्यात गुंतवणूक करण्याला प्राधान्य देत आहेत. हक्काचा परतावा हे त्यामागचे कारण आहे.

# ६ वे अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलन बार्शी टाकळीत

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**बार्शी –** वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था बार्शीटाकळी अंतर्गत वऱ्हाडी साहित्य मंच अकोलाचे ६ वे अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलन वैराग्य मूर्ती श्रीसंत गाडगे बाबाच्या जयंती दिनी म्हणजेच दि.२३ फेब्रुवारी-२०२५ ला प्रभूपार्वती मंगल कार्यालय, बार्शीटाकळी जि. अकोला येथे संपन्न होत आहे.

अ.भा.वऱ्हाडी साहित्य मंचामार्फत वऱ्हाडी बोलीच्या संवर्धनासाठी वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. वऱ्हाडी मायबोलीचा जागर सतत सुरु रहावा या उद्देशाने मंचाने २०१५ पासून पाच अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलने वऱ्हाडात विविध ठिकाणी घेतले असून यावर्षीचे ६ वे अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलन बार्शीटाकळी येथे आयोजित केलेले आहे.

संमेलनाध्यक्ष म्हणून ख्यातनाम वऱ्हाडी साहित्यिक तुळशीराम बोबडे, उदघाटक म्हणून तहसिलदार, राजेश वझिरे, स्वागताध्यक्ष भारत बोबडे हे असून संमेलनात प्रमुख अतिथी म्हणून ५ व्या अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष किशोर बळी, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी सदस्य, प्रसिद्ध कादंबरीकार व वऱ्हाडी साहित्यिक पुष्पराजदादा गावंडे, ख्यातनाम पत्रकार व साहित्यिक सुरेश नागले मुंबई, प्रसिद्ध साहित्यिक मा.शंकरराव घोरसे, नागपूर, प्रभाकर चव्हाण, ठाणेदार, प्रकाश तुणकलवार व संत साहित्याचे गाढे अभ्यासक व सुप्रसिद्ध वक्ते प्रा. डॉ.राजेश मिरगे यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे.

वऱ्हाडी साहित्य व वऱ्हाडात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तीमत्वाचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षी विविध पुरस्कार मंचातर्फे जाहीर करण्यात येतात. यावर्षीचे पुरस्कार ज्येष्ठ वऱ्हाडी साहित्यिक आबासाहेब कडू, अमरावती यांना जीवनगौरव -२०२५, युवा वऱ्हाडी साहित्यिक अजय इंगळे यांना 'यलाई' पुष्पराज गावंडे पुरस्कार, वऱ्हाडी साहित्यिका अश्विनी घुले यांना स्व.सुमनबाई ठक स्मृती 'महिला वऱ्हाडरत्न' पुरस्कार, संजय वाट यांना वऱ्हाडरत्न (पत्रकारिता) मा.हरिदास रत्नपारखी यांना वऱ्हाडरत्न (समाजसेवा) प्रा.डॉ.सुनिल पखाले, कारंजा घाडगे यांना वऱ्हाडरत्न (साहित्य सेवा) पुरस्कार जाहीर झालेले आहेत.संमेलनात मान्यवरांच्या हस्ते या सर्वांना पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. वऱ्हाडी बोलीभाषेवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी या संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष भारत बोबडे, मंचाचे अध्यक्ष श्याम ठक, पुष्पराजदादा गावंडे, निलेश कवडे, रवींद्र दळवी, निलेश देवकर, अनुराधा धामोडे, डॉ.मीना सोसे, शैला चेडे, साधना काळबांडे, वैशाली गावंडे, विद्या राणे यांनी केलेले आहे.





## राजधानीतील मराठी साहित्य संमेलन दिल्लीत मराठी माणसाचे महत्व वाढवणारे ठरेल




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नवी दिल्ली –** 'राजधानीतील मराठी साहित्य संमेलन दिल्लीत मराठी माणसाचे महत्व वाढवणारे ठरेल, अशा भावना 'मराठी भाषा, मराठी माणूस आणि दिल्ली' या परिसंवादात मान्यवरांनी व्यक्त केल्या. दिल्ली महाराष्ट्रापासून दूर असली तरीही दिल्लीचे तख्त राखण्यासाठी कायम मराठी माणूस धावला आहे, अशाही भावना मान्यवरांनी बोलून दाखवल्या. सरहद, पुणे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने या परिसंवादाचे दिल्लीत आयोजन करण्यात आले. साहित्य संमेलनाची आयोजक आणि सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार हे अत्यंत उत्कृष्ट आयोजन करत आहेत. यापूर्वीही त्यांनी अनेक चांगले कार्यक्रम राबवले आहेत. ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक होईल, असा विश्वास खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला. प्रशासकीय अधिकारी आनंद पाटील म्हणाले की, तमिळनाडूपासून दिल्लीपर्यंत महाराष्ट्राबाहेर राहून महाराष्ट्र अनेक वर्षांपासून बघितला. आपला देदीप्यमान इतिहास आपल्या नव्या पिढ्यांनाही माहिती व्हावा आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या मराठी बांधवांकडूनही महाराष्ट्राची सेवा घडावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्राबाहेर अनेक अधिकाऱ्यांना स्थिरस्थावर होताना ज्येष्ठ अधिकाऱ्यांची मदत झाली. त्यांनी स्थापन केलेले मराठी माणसाचे समूह, संस्थांची मदत झाली, अशा भावना सौरभ देशमुख यांनी व्यक्त केल्या.



## लक्षवेधी छायाचित्र....




Catwalk - White-breasted waterhen

(छाया - संजय दारमवार, मुंबई)








– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## अंतर्मन नेहमीच अत्यंत महत्वाचं

**ज्योतिर्मय साहित्य**

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता ही देखील भिन्न असते. ह्या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून कुटुंबामध्ये एकता निर्माण करावी लागत असते. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि एकूणच आपल्या वाट्याला अपयश येतं. आपल्या दृष्टिकोनावर आपले अनुभव संचित होत असतात. हे अनुभव सुख-दुःखाचे म्हणजेच संमिश्र स्वरूपाचे असतात. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातील वातावरण असणं अथवा ते निर्माण करणं निश्चितच उपयोगाचं ठरतं.

अनेकदा दुःख अधिक आणि सुख मात्र अगदी थोडं आपल्या वाट्याला आलं असल्याचं म्हंटलं जातं. खरं तर, जसा चष्मा लावावा तसंच दिसतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. अनेकदा मनांत येणारे विचार आपल्या गत अनुभवांशी निगडीत असतात तर ते काहीवेळा नजीकच्या भविष्यात काय, कसं आणि कधी घडावं ? याबद्दलचे असतात. आयुष्याच्या अवघड शाळेत आपण कोणत्या वर्गात आहोत, परीक्षा कोणती आहे हे ठाऊक असतंच असं नाही; कॉपी करता येत नाही कारण प्रत्येकाची प्रश्नपत्रिका वेगळी असते.

## श्रीपाद वल्लभ दिगंबरा...





**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

गुरुचरित्रातील कथेप्रमाणे त्याच्यावर भक्ती करणारी आणखी एक व्यक्ती त्या परिसरात होती. तो होता त्या गावातील परीट. रोज कपडे धुण्यासाठी तो कृष्णाकाठी यायचा. या तेजस्वी बालकाला पाहिलं की त्याला शांत आणि प्रसन्न वाटायचं. तो मनोमन त्याला दुरूनच नमस्कार करायचा. आपलं काम सुरु करायच्या आधी त्याचं नित्यनेमानं दर्शन घ्यायचा. कृष्णेकाठी मळलेले कपडे धूत असताना या तेजस्वी यतीच्या दर्शनानं त्याचं मनही शुद्ध, स्वच्छ होऊ लागलं.

असा दिनक्रम सुरु असताना एक दिवस एक घटना घडली. त्या परिसरातील एक यवन राजा आपल्या राण्यांसह कृष्णेकाठी जलविहार करण्यासाठी आला. राजाच्या सैनिकांनी या परिटाला तेथून हाकलून लावलं. परीट राजाचे ऐश्वर्य, त्याची आपल्या राण्यांसोबत चाललेली जलक्रीडा पाहत होता. या राजाच्या भाग्याचा त्याला मनोमन हेवा वाटला.



आपल्या विचारातच तो श्रीपाद स्वामींजवळ पोहोचला. त्यांचे दर्शन घेऊन निघावे असा विचार त्याने केला. स्वामींनी त्याच्या मनातले विचार जाणले होते. पण त्यांनी त्याला सहजच विचारले, रजका, कसला विचार करतोस ?

परीट ओशाळला. तो म्हणाला, काही नाही महाराज, तो माझा मूर्खपणा होता. क्षमा असावी.


स्वामी म्हणाले, अरे जन्मभर कष्ट करणाऱ्या जीवाला कधीतरी सुखोपभोगाची इच्छा होणं स्वाभाविक आहे. बोल, तुला या जन्मी हे सगळे सौख्य हवे की पुढील जन्मी ?

रजक म्हणाला, हा देह आता थकला आहे महाराज. त्यामुळे आता आयुष्याच्या उत्तरार्धात हे सुख मिळून काय उपयोग ?

स्वामी म्हणाले, ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे होईल. पुढील जन्मी तू यवन कुळात जन्म घेशील. राज्योपभोग घेशील.

परीट म्हणाला, पण महाराज, यवन कुळात.... ?

स्वामी म्हणाले, काळजी करू नकोस. तुझ्या उतारवयात पुन्हा आपली भेट होईल. नंतर तू मोक्षमार्गाचा अधिकारी होशील. खरोखरच त्या परिटाचा जन्म पुढे यवन कुळात होऊन तो राजा झाला. श्रीपाद श्रीवल्लभांनी आपल्या दुसऱ्या म्हणजे श्री नृसिंह सरस्वतींच्या अवतारात त्याची भेट घेतली आणि तो उद्धरून गेला. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## नरदेहस्तवन (समास दहावा)

**ज्योतिर्मय साहित्य**

अध्यात्मिक द्रुष्टी ठेऊन समर्थानी नरदेहाचे गुणवर्णन केले आहे. नरदेह मिळाल्यावर भक्ती, विरक्ती मुळे अध्यात्मिक प्रगती साधता येते. नरदेहाची प्राप्ती झाल्यावर पुष्कळ जण अहंकार सोडून देतात व आत्मानंदाने जीवन जगतात. संत महंत, ऋषीमुनी, सिध्द साधू, समाधानी भक्त, मुक्त, विरक्त ब्रम्हज्ञानी, योगी, तपस्वी, तत्त्वज्ञानी, योगाभ्यासी, ब्रम्हचारी, दिगंबर सन्यासी, षट्दर्शनी, तापसी हे महाश्रेष्ठ लोक नरदेहातच झाले. आणि म्हणूनच नरदेह श्रेष्ठ आहे. नरदेह स्वाधीन आहे. स्वतंत्र आहे. पण तो पराधीन नाही किंवा परतंत्र नाही.

माणसाच्या शरिराचा मनाचा विचार करता येतो माणसाचा मेंदू वजनाने व आकाराने सर्वात मोठा आणि रचनेच्या द्रुष्टीने सर्वात ऊत्तम मेंदू आहे. त्याच्या मध्ये विलक्षण सामर्थ साठवलेले असते. माणसाच्या बुध्दीची व कल्पनेची पातळी खुपच श्रेष्ठ प्रतीची असल्याचे अनुभवास येते. ज्ञेय वस्तुचा अर्थ समजणे त्याचे अंतरंग शोधणे अनेकातील एकत्व पहाणे सान्ताकडून अनंताकडे झेप घेणे, या अफाट विश्वाचे नीट अकलन करणे हे सर्व नरदेह मिळालेला माणूसच करू शकतो. पण त्याच्या पलीकडे जाऊन स्वतःमधे व विश्वामधे अंतर्यामीपणाने खेळणारे सत्चितानंद स्वरूप प्रत्यक्ष अनुभवण्याचे विलक्षण सामर्थ्य सद्गुरूच्या दासात आहे.

सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चार मुक्ती पैकी ज्याला जी आवडली ती त्याने स्विकारली आणि मुक्ती मिळवली. कोणी हटयोगाचा अभ्यास करून देहाला अत्यंत धारेवर धरतात तर कोणी ''देव आहेच''ही भावना वाढवून तिच्या जोरावर देव आपलासा करतात. कोणी थोर महात्मा म्हणून प्रसिद्धी मिळवता. तर कोणी भक्त म्हणून किर्तीमान होतात. तर कोणी नरदेहाची प्राप्ती झाल्यावर अहंकार सोडून आत्मानंदाने समाधान पाऊन ऊत्तम पदास पोहचतात. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम निष्ठेने घ्यावे

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम श्रध्देने घेणे म्हणजे काय ? तर आपल्या गुरूने किंवा ज्याच्याबद्दल आपली पूज्य भावना असते अशा व्यक्तीने सांगितले म्हणून घेणे. अशा श्रद्धेने नाम घेणार्याच्या मनात शंका येत नाही. ही स्थिती फार भाग्याची पण तितकीच दुर्मिळ. निष्ठेने नाम घेणे म्हणजे शंकारहित नाम घेणे. शंका अनेक तर्हेच्या असतात. नाम घेताना भगवंताकडे लक्ष नसले तर त्या नामाचा उपयोग आहे की नाही, नाम घेताना बैठक कोणती असावी, दृष्टि कशी असावी, शुचिर्भूतपणेच नाम घ्यावे किंवा कसे, अशा तर्हेच्या अनेक शंका मनात येतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपण जे नाम घेतो ते भगवंतापर्यंत पोहोचते की नाही, ह्या एका शंकेत सर्व शंकांचा समावेश होतो. भगवंत आणि त्याचे नाम एकरूपच असल्याने त्या दोहोंच्या आड काहीच येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागून आपण चाललो असताना आपल्या तोंडून त्याचे नाव उच्चारले गेले तर तो लगेच मागे वळून बघतो. ही जर मनुष्याची स्थिती तर भगवंताच्या बाबतीत त्याचे नाव त्याच्यापर्यंत पोहोचत नाही हे कसे शक्य आहे? खरे पाहिले तर भगवंताचे नाव त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते; म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो; मग नाम भगवंतापर्यंत पोहोचते की नाही ह्या शंकेला वावच कोठे राहिला ? समजा दोन माणसे जेवायला बसली. त्यांतल्या एकाच्या मनात काही विचार घोळत असून त्याचे जेवणाकडे लक्ष नव्हते, पण हाताने तोंडात एकेक घास घालण्याचे काम चालू होते. दुसरा इसम मात्र लक्षपूर्वक जेवण जेवीत होता. दोघेही जेवून उठले. ह्यात उपाशी कोण राहिला ? दोघांचीही पोटे भरलीच ! तसे नाम घेतल्यानंतर त्याचा उपयोग झाला नाही असे कसे होईल ?

समजा आपण परगावच्या एका अनोळखी इसमाला पत्र लिहून त्याला बोलाविले; तो आला आणि त्याने सांगितले की, तुम्ही ज्याला पत्र पाठविले तोच मी, तर त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आपण त्याला जवळ करतो. तसे, भगवंताने सांगितले आहे की जेथे माझे नाम तेथे मी पुरूषोत्तम; तर मग या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पहावे, असे का करता येऊ नये ? हीच श्रध्दा. आपण ज्याचे पोटी जन्माला आलो त्याचेच नाव आपल्या पुढे लावतो तसे भगवंताच्या बाबतीत करावे. त्याचेच नावाने जगावे; म्हणजे माझा सर्व कर्ता, रक्षिता तो एकच असून त्याच्याशिवाय माझे या जगात दुसरे कोणीही नाही, या भावनेने राहावे. असा जो भगवंताचा होतो त्याचे महत्व भगवंत स्वतःपेक्षाही वाढवतो.

नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी.





विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## आपण काय करावे

**ज्योतिर्मय साहित्य**

आतापर्यंत आपण बऱ्याच गोष्टी बघितल्या. त्यात काय करू नये हे विशेषतः सांगितले होते. आज आपण काय करावे यावर लक्ष देऊया. या गोष्टी आपण रोजच आचरणात आणल्या तर त्याचा स्वतःसहित सर्वांनाच फायदा होणार आहे. उपनिषदामध्ये एक थोर वचन आहे. या विश्वातील वस्तुमात्र ईश्वराने व्यापलेले आहे. त्यामुळे त्यागपूर्वक (जीवनावश्यक) भोगाचा स्वीकार करावा. कोणत्याही धनाचा लोभ करू नये हा सिद्धांत म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया आहे. त्याग पूर्वक भोग आणि लोभाचा त्याग यामुळे आपले जीवन समृद्ध बनू शकते. त्यासाठी मनाचे सामर्थ्य वाढवावे लागते. आपल्या बलवंत मनाला अंतर्मुख बनवण्यासाठी व्रते फार महत्त्वाची असतात. व्रत म्हणजे निश्चयाने सतत अखंडपणे करायची कृती. त्यासाठी निष्ठा धैर्य सहनशीलता असे गुण असावे लागतात.

आत्ता पर्यंत आपण सोपी व्रते बघितली. आजही सहज अंगीकार करता येतील अशी व्रते बघू या. यात रोज आचरणात आणण्याची व्रते आहेत.

१) रोज व्यायाम करणे. ज्याला जो जमेल त्याने तशा पद्धतीने करणे. रोज प्राणायाम करणे.

२) रोज ध्यान करणे.

३) चेहेऱ्यावर एक स्मितहास्य कायम असावे. त्यामुळे बघणाऱ्या व्यक्तीला आनंद मिळतोच. पण याचा फायदा आपल्याला जास्त होतो. हसण्या मुळे शरीरात एंडॉरफिन नावाचा अंतस्त्राव स्त्रवू लागतो. तो पेनकिलरचे काम करतो.

४) कायम वर्तमानात रहावे. काल काय झाले हे आठवू नये.आणि उद्या काय होणार याचीही चिंता करु नये.

५) प्रत्येक घटना, व्यक्ती यातील सकारात्मकता शोधून त्याकडे लक्ष द्यावे. आणि सकारात्मक बोलावे.

५) जमेल तेवढे कोणत्याही स्क्रीन पासून लांब रहावे. आवश्यक तेवढाच वापर करावा.

६) सामाजिक संपर्क ठेवावा. त्यामुळे आपली मनस्थिती नक्कीच बदलते.

७) तुलना करण्या पासून लांब रहावे. कोणाचीच कोणाशी अगदी स्वतःची सुद्धा इतर कोणा बरोबर तुलना करू नये.

८) अपेक्षा फक्त स्वतःकडून ठेवावी. साधारणपणे अपेक्षा दुसऱ्या व्यक्ती कडून ठेवली जाते. आणि अपेक्षा या शब्दाला जोडून येणारा शब्द बहुतांशी भंग हा असतो. आणि अपेक्षा भंग झाला की त्याच्या बरोबर दुःख, मानसिक ताण येतोच.

९) शक्य तेवढा आनंद द्यावा. आपण जे जे दुसऱ्याला देतो ते आपल्याकडे कित्येक पटींनी परत येते. आनंद हवा असेल तर तो वाटावा. म्हणजे सगळेच आनंदी राहतील.

१०) महत्त्वाचे म्हणजे यातील जमतील तेवढी व्रते अंगीकारण्याचा प्रयत्न करावा.

व्रते वैकल्ये कायमच असतात. फक्त त्या त्या काळानुसार त्यात बदल होत असतो. त्याप्रमाणे आजच्या काळाला अनुकूल व अनुरूप अशी काही व्रते सांगितली आहेत अर्थात हे माझे विचार आहेत. पण त्याचा फायदा मात्र नक्कीच आहे.

व्रतोपासना एक ते दहा वाचल्याबद्दल धन्यवाद!



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**शास्त्रोपस्कृतशब्दसुन्दरगिरः शिष्यप्रदेयागमा**
**विख्याताः कवयो वसन्ति विषये यस्य प्रभोर्निर्धनाः ।**
**तज्जाड्यं वसुधाधिपस्य कवयस्त्वर्थं विनापीश्वराः**
**कुत्स्याः स्युः कुपरीक्षका हि मणयो यैरर्घतः पातिताः ।।**

अर्थ – शास्त्रांनी संस्कारित, सुंदर वाणीने आपल्या शिष्यांना ज्ञानदान करणारे विद्वान जर एखाद्या राजाच्या राज्यात निर्धन राहत असतील, तर हे त्या राजाचे अज्ञान आहे. कारण विद्वान निर्धन असूनही ईश्वरासमान पूजनीय असतात. जर कोणी रत्नपारखी रत्नाचे मूल्य कमी करत असेल, तर तो पारखीच निंदेस पात्र ठरतो.


राज्यकर्त्यांची विद्वान लोकांच्या बाबतीत काही कर्तव्ये असतात, या विषयी भर्तृहरी या श्लोकात सांगतात. ज्ञानदान हा विद्वान लोकांचा स्थायीभाव असतो. ते सतत ज्ञानदानात मग्न असतात. यामुळे त्यांना धनार्जनासाठी वेळ मिळत नाही. अशा वेळेस त्यांच्या योगक्षेमाचे दायित्व राज्यकर्त्यांनी निर्वहित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन या ठिकाणी कविराज भर्तृहरी करतात.




## खाणे : एक अभ्यास !

You are what you eat अशी एक म्हण आहे. म्हणजे तुम्ही जे खाता तसे असता. आसपासच्या समुदायावर सहज नजर टाकली तरी कळेल कोण काय खात असेल ते. कमरेच्या पट्ट्याबाहेर येवू पाहणारं पोट समोर आलं की आतले वडापाव, समोसे दिसू लागतात. गावाकडनं आलेला, कष्टाने राबलेला चेहेरा दिसला की त्याच्या चुलीवरची ज्वारीची भाकरी समजून घेता येते, कपाळावरच्या घामातनं वाहून जाणारा अंगारा टिपता आला तर इडली / डोशाचा अंदाज येतो, आपली चाळीशी लपवू पाहणाऱ्या एखाद्या ललनेच्या चेहऱ्यावरचं डाएटचं प्रेशर आणि सतत उकडलेल्या भाज्या खाऊन आलेला कंटाळा सहज लक्षात येतो. याचा अर्थ इतकाच की आपलं व्यक्तिमत्त्व आपल्या जिव्हाल्यावरचं नियंत्रण वा त्याचा अभाव यावर अवलंबून असतं.

थोडक्यात बोलणं असेल वा खाणं जिभेवरचं नियंत्रण हे नेहमीच उपयोगी असत. हे आता मोठ्या प्रमाणावर कळायला लागलंय अनेकांना त्यामुळे हे असं कळणारे खाण्याबाबतीत कमालीचे चोखंदळ झालेत. कोणी कार्बघटक (पिष्ठमय पदार्थ) खातंच नाही, कोणी फक्त प्रथिनेच (प्रोटीन) खातं, आणखी कोणी शनिवार/रविवार खाण्यावर आडवा हात मारतं आणि मधले दिवस उपासतापासात घालवतं.



परंतु योग्य आणि प्रमाणात खाणे कसे ठरवायचे हे मात्र कोडेच बनून राहते. मग खावे काय ?


सहज आणि सोप्या भाषेत सांगायचं झालं तर आपल्या प्रदेशात उगवणारे (मिळणारे) पदार्थ खाणे हे त्या त्या प्रदेशातील व्यक्तींना फायद्याचे ठरते. तसेच ते त्या त्या ऋतूमधील असणे आवश्यक आहे. निसर्गाने ते त्याप्रमाणे प्रस्तुत केलेले असते. त्यामुळेच ते आरोग्यासाठी हितकारक असते. जसे आंबे उन्हाळ्यातच, जांभूळ पावसाळ्यातच खाणे हितकारक ठरते.

त्या त्या ऋतूनुसार व त्या त्या प्रदेशानुसार आपला आहार घेणे गरजेचे असते.

****

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। श्री स्वामी समर्थ ।।




**ज्योतिर्मय साहित्य**


स्वामी म्हणतात – अडचणी आयुष्यात नव्हे तर मनात असतात... ज्या दिवशी मनावर विजय मिळवाल त्या दिवशी आपोआप मार्ग निघेल.....! तुमच्याकडे काय आहे किंवा काय नाही हे महत्वाच नाही तर असलेल्या परिस्थितीत तुम्ही कसे जगता हे महत्वाचं आहे..!

''अशक्य ही शक्य करतील स्वामी.''

''श्री स्वामी समर्थ महाराज म्हणतात माझ्या प्राणप्रिय स्वामी भक्तांनो, स्वामींना त्यांचे कुळ आणि मुळ विचारले असता स्वामी समर्थ महाराज अत्यंत विनोदी उत्तर देत, मुळपुरुष आमचे वडाचे झाड, दत्तनगर, मुळ अशा गुढमय शब्दात स्वामी आपली ओळख करुन देत व जात चांभार व आई बाप महार, असे उत्तर ते देत असत. स्वामी समर्थ महाराज स्वभावाने खूप कडक पण आतून एकदम प्रेमळ स्वभावाचे होते आणि विनोदी बुध्दीचे होते...

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**

केवळ पुस्तकी ज्ञान देणाऱ्या शाळा आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यांमध्ये माहितीचे भेंडोळे कोंबून त्यांना पदवी देणारी विद्यापीठे यांच्या ते विरुद्ध होते. असल्या शाळांची आणि विद्यापीठांची बंगालमध्ये आणि देशात कमी नव्हती. त्यांची शाळा या सर्वांपेक्षा वेगळी असणार होती. त्यांच्या शाळेत नवनिर्मितीला प्राधान्य होतं, सृजनशील विचारांची आणि त्याचबरोबर कृतीची ती प्रयोगशाळा असणार होती. त्यांच्या शाळेत केवळ अनुकरणाला, पाठांतराला फाटा देण्यात आला होता. शांतिनिकेतन, श्रीनिकेतन आणि विश्वभारती यांची आंतरिक प्रेरणा याच संकल्पनेतून निर्माण झाली होती. श्रीनिकेतनात रवींद्रनाथांचे नाट्यप्रयोग, ऋतूंचे उत्सव साजरे केले जात होते. ग्रामीण आणि शहरी जीवनात पडलेलं अंतर कमी करण्यासाठी आणि ग्रामीण भागाच्या पुनर्निर्माणासाठी श्रीनिकेतनात प्रयत्न केले जात होते. तर शांतिनिकेतन हे विविध विद्या आणि कला यांच्या शिक्षणाचे माहेरघर होते. विश्वभारती केवळ पदवी वाटप करण्यासाठी नव्हतं तर चैतन्यमय युवक घडावा, त्याची ज्ञानेन्द्रीयं आणि कर्मेंद्रियं हातात हात घालून चालावीत आणि त्याच्यातून एक उत्तम नागरिक घडावा हा त्याच्या स्थापनेमागील उद्देश होता.

आपल्या बोलीभाषेतील कविता, संस्कृतातील सुंदर आणि अर्थपूर्ण स्तोत्रे विद्यार्थ्यांची सहज मुखोद्गत होत होती. या कविता, स्तोत्रे चालीवर सहज गुणगुणता येत होती. या पार्श्वभूमीवर इंग्रजी कविता घोकून पाठ करणे त्यांना आवडत नव्हते. इंग्रजी भाषेचा त्यांना द्वेष होता, इंग्रजी कविता त्यांना आवडत नव्हत्या असा त्याचा अर्थ नाही. इंग्रजी वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास होताच पण विनाकारण आपल्या विद्यार्थ्यांवर हे ओझे लादण्यासाठी त्यांचे मन तयार नव्हते. त्याकाळी इंग्रजी शिक्षणाच्या निमित्ताने इतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर लादलं गेलेलं इंग्रजी भाषेचं जोखड त्यांनी काढून टाकण्याचं ठरवलं.

**(क्रमशः)**

# नात्यातील गोडवा हरवतोय !

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजच्या काळात आधुनिक जीवनशैलीमुळे आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे कुटुंबातील नाती हरवत चालली आहेत. नशिबाने मिळालेली गोड माणसं आपण केवळ क्षणिक त्रासाने तोडून टाकतो, हे कटू सत्य आहे. उद्या सगळं काही मिळेलही, पण आपल्या सोबत हक्काने भांडणारं, रुसणारं, आणि लहानशा समजुतीने हसवणारं गोड प्रेम मात्र कदाचित नसेल. घरातील जेष्ठ व्यक्ती आपल्याला चांगल्या मार्गावर वळवण्यासाठी कधी रागावतात, तर कधी चार चांगल्या गोष्टी शिकवतात. पण हल्लीची पिढी ही अनुभवाच्या या खजिन्याकडे दुर्लक्ष करते. त्यांना ज्येष्ठांची शिकवण कटकट वाटते. खरंतर, आयुष्याने शिकवलेले धडे ते त्यांच्या भाषेत सांगतात, पण त्याकडे हल्लीचा युवा वर्ग सहसा काय ही किरकिर आहे किंवा कटकट म्हणून पाहतो....

हल्लीची मुलं आभासी जगात अडकलेली दिसतात. लॅपटॉप, मोबाईल, आणि टीव्ही हीच त्यांची दुनिया झाली आहे. मोबाईल गेम्स, टीव्हीवरील मालिका, आणि कार्टून बघण्यात त्यांचा अमूल्य वेळ वाया जातो. अभ्यासाकडे दुर्लक्ष होते, आणि आई-वडील त्यांना सांगायला गेले तर त्यांचा राग होतो. आजच्या पिढीला या वेळेची किंमत उशिरा समजेल.....

यासोबतच, कुटुंबातील नात्यांमध्ये येणारा ताणही वाढलेला दिसतो. सासूने सूनेला घरसंसार शिकवण्याचा प्रयत्न केला तर ती तिला कटकट वाटते. सुनेला वाटतं की सासूच्या सल्ल्यांमध्ये प्रेम नाही, फक्त हस्तक्षेप आहे. या नात्यातून ताण वाढतो, आणि बरेचदा याचे परिणाम सासू-सुनेच्या नात्याला तुटण्याच्या टोकावर नेऊन ठेवतात....



सीमा गाडेकर
छत्रपती संभाजीनगर

पण सून हा विचार कधीच करत नाही की आपली सासू जे काही आपल्याला सांगत आहे ते आपल्या हिताचे आहे... कारण कुठल्याही आईला आपल्या मुलाचा संसार चांगला व्हावा असंच वाटत असतं... पण हल्लीच्या सुनबाईना सासुबाईच्या चार शिकवणीच्या गोष्टी म्हणजे किरकिर वाटते ...

सासू-सुनेच्या वादात मुलगा गोंधळून जातो. एकीकडे आईने आयुष्यभर त्याच्यासाठी कष्ट उपसलेले असतात, तर दुसरीकडे पत्नीच्या इच्छांचा आदर करण्याची त्याची जबाबदारी असते. काही मुलं बायकोच्या प्रेमापोटी आंधळी होऊन आई-वडिलांना वाऱ्यावर सोडतात. ज्या आईने आयुष्यभर कष्ट करून, रात्रंदिवस जागरण करून मुलांनी वाढवलं, त्याच्यासाठी काटकसरीने संसार करून संपत्ती जमवली, तिचाच मान कमी केला जातो..... आजी-आजोबांच्या प्रेमाला नातवांना पारखे करण्यामागे सुनेचं वागणं असतं.परंतु या गोष्टी एका बाजूने चुकीच्या आहेत. हल्लीच्या सुनांनी लक्षात घ्यायला हवं की आपण जसं वागतो, तसं आपली मुलं शिकतात. त्यातले त्यात लहान मुलं आपल्या आईचा अनुकरण करत असतात कारण नाही हाच त्यांचा पहिला गुरु असतो..... म्हणून आजच्या सुनांनी लक्षात ठेवलं पाहिजे आज तुम्ही सासू-सासऱ्यांशी वाईट वागाल, त्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखवाल तर.... तर उद्या तुमची मुलंही मोठी झाल्यावर तुमच्याशीही तसंच वागतील. आपण ज्या संस्कारांचं बीज आज रुजवतो, त्याचा परिणाम भविष्यात आपल्यावरच होतो.. थोडक्यात काय जे पेराल तेच उगवेल...



आजच्या पिढीने हे लक्षात घ्यायला हवं की आयुष्य क्षणभंगुर आहे. प्रत्येक नात्याची कदर करा. आपल्या गोड माणसांच्या भावना ओळखा. ज्येष्ठांनी सांगितलेल्या गोष्टी अनुभवाच्या प्रकाशातून दिलेल्या असतात. त्या टाळणं म्हणजे स्वतःचं नुकसान करणं आहे. आपल्या आई-वडिलांची सेवा करणं, त्यांना प्रेमाने दोन शब्द बोलणं हेच खरे भक्तीचे कार्य आहे. आपल्या मुलांनाही हा आदर्श शिकवा. मोबाईल, टीव्ही, आणि आभासी जगात हरवण्यापेक्षा आपल्या नात्यांच्या गोडव्याला जपलं पाहिजे. त्यांना आपल्या प्रेमाचा ओलावा द्या, आणि त्यांच्या जीवनात आपला एक आनंदाचा क्षण बनवा...

आयुष्यात गेलेला क्षण कधीही परत येत नाही. म्हणूनच नात्यांमधील गोडवा जपण्यासाठी प्रयत्न करा आणि प्रत्येक नात्याला मान द्या. कारण आयुष्य सुंदर बनवण्यासाठी हक्काची माणसं खूप महत्त्वाची असतात.....

# विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारांचे यंदाचे मानकरी ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब बोराडे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची घोषणा


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई –** मराठी भाषा विभाग अंतर्गत २०२४ करिता विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब रंगराव बोराडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नामवंत प्रकाशन संस्थेसाठी २०२४ चा श्री.पु. भागवत पुरस्कार हा ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे या संस्थेला जाहीर करण्यात आला आहे. डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार २०२४ हा डॉ.रमेश सिताराम सुर्यवंशी यांना आणि श्री.मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार २०२४ हा श्रीमती भीमाबाई जोंधळे यांना जाहीर झाला आहे.

मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रूपये १० लाख असे विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप आहे. नामवंत प्रकाशन संस्था पुरस्कार- मानपत्र, सन्माचिन्ह व रूपये ५ लाख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तर भाषा अभ्यासक आणि भाषा संवर्धन पुरस्कार- मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रूपये २ लाख असे पुरस्काराचे स्वरूप असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत केली.

मराठी भाषा मंत्री सामंत यांनी बीकेसी येथे पत्रकार परिषदेत पुरस्कारांची घोषणा केली. हे पुरस्कार महाराष्ट्र शासनामार्फत मराठी भाषेतील दिग्गज साहित्यिकांना देण्यात येतात या पार्श्वभूमीवर यंदापासून हे पुरस्कार गेट वे ऑफ इंडिया समोर दिमाखदार सोहळ्यात २७ फेब्रुवारी २०२५ रोजी देण्यात येणार आहे. या पुरस्कारांची निवड करण्यासाठी नामवंत साहित्यिकांची समिती नेमण्यात असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.

याशिवाय ग्रामीण साहित्यासाठी २०२३ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात वाङ्मय पुरस्कार प्रकार प्रौढ वाङ्मय अंतर्गत काव्य प्रकारात कवी केशवसूत पुरस्कार हा एकनाथ पाटील यांना 'अनिष्ठकाळाचे भयसूचन' या पुस्तकासाठी जाहीर करण्यात आला आहे. प्रौढ वाङ्मय नाटक / एकांकिका याकरिता राम गणेश गडकरी पुरस्कार हा मकरंद साठे यांना, प्रौढ वाङ्मय कादंबरी याकरिता हरि नारायण आपटे पुरस्कार हा आनंद विंगकर यांना, प्रौढ वाङ्मय लघुकथा याकरिता दिवाकर कृष्ण पुरस्कार हा दिलीप नाईक-निबांळकर यांना, प्रौढ वाङ्मय ललितगद्य याकरिता अनंत काणेकर पुरस्कार अंजली जोशी यांना, प्रौढ वाङ्मय-विनोद याकरिता श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार हा शेखर गायकवाड यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रौढ वाङ्मय चरित्र याकरिता न. चिं.केळकर पुरस्कार हा विवेक गोविलकर, प्रौढ वाङ्मय आत्मचरित्र याकरिता लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार हा डॉ.वसंत भा.राठोड यांना, प्रौढ वाङ्मय समीक्षा/संशोधन/ सौंदर्यशास्त्र/ललितकला/आस्वादपर लेखन याकरिता श्री.के.क्षीरसागर पुरस्कार हा समिर चव्हाण यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रौढ वाङ्मय राज्यशास्त्र / समाजशास्त्र याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारांसाठी शिफारस नसल्याचे मंत्री श्री.सामंत यांनी सांगितले.




त्याचप्रमाणे, प्रौढ वाङ्मय इतिहास याकरिता शाहू महाराज पुरस्कार हा प्रकाश पवार यांना, भाषाशास्त्र/ व्याकरण याकरिता नरहर कुरूंदकर पुरस्कार हा उज्ज्वला जोगळेकर यांना, विज्ञान व तंत्रज्ञान याकरिता महात्मा जोतीराव फुले पुरस्कार हा सुबोध जावडेकर यांना, शेती व शेतीविषयक पुरक व्यवसाय लेखनाकरिता वसंतराव नाईक पुरस्कार हा डॉ.ललिता विजय बोरा यांना, उपेक्षितांचे साहित्य याकरिता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार हा सुनीता सावरकर यांना तर अर्थशास्त्र व अर्थशास्त्रविषयक लेखन याकरिता सी. डी.देशमुख पुरस्कारांसाठी शिफारस करण्यात आली नसल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच तत्वज्ञान व मानसशास्त्र याकरिता ना.गो. नांदापूरकर पुरस्कार हा या.रा.जाधव यांना, शिक्षणशास्त्र करिता कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार हा हेमंत चोपडे यांना, पर्यावरण करिता डॉ.पंजाबराव देशमुख पुरस्कार हा माधव गाडगीळ यांना, संपादित/आधारित याकरिता रा. ना.चव्हाण पुरस्कार संपादक रविमुकुल यांना, अनुवादित करिता तर्कतीर्थ लक्ष्मणशात्री जोशी पुरस्कार हा अनुवादक श्रीकांत अरूण पाठक यांना तर संकीर्ण याकरिता भाई माधवराव बागल पुरस्कार हा सुप्रिया राज यांना घोषित करण्यात आला आहे. या प्रौढ वाङ्मय प्रकारातील प्रत्येक पुरस्काराची रक्कम रूपये १ लाख आहे.

वाङ्मय पुरस्कार प्रकार बाल वाङ्मय यात कविता याकरिता बालकवी पुरस्कार हा प्रशांत असनारे यांना तर, नाटक व एकांकिका याकरिता भा. रा.भागवत पुरस्कार संजय शिंदे यांना, कादंबरी प्रकारात साने गुरूजी पुरस्कार हा रेखा बैजल यांना, कथा प्रकारात राजा मंगळवेढेकर पुरस्कार हा शरद आपटे यांना, सर्वसामान्य ज्ञान याकरिता यदुनाथ थत्ते पुरस्कार हा डॉ.प्रमोद बेजकर यांना तर बालवाङ्मय संकीर्ण या प्रकारातील ना.धो.ताम्हणकर पुरस्कार हा डॉ.आनंद नाडकर्णी यांना जाहीर करण्यात आला. या पुरस्कारांची रक्कम रूपये ५० हजार आहे.

वाङ्मय पुरस्कार प्रकार प्रथम प्रकाशन अंतर्गत काव्य याकरिता बहिणाबाई चौधरी पुरस्कार हा तान्हाजी रामदास बोऱ्हाडे यांना, नाटक/ एकांकिका याकरिता विजय तेंडुलकर पुरस्कार हा हरीष बोढारे यांना, कादंबरी या प्रकारातील श्री.ना.पेंडसे पुरस्कार हा प्रदीप कोकरे यांना, लघुकथेसाठीचा ग.ल.ठोकळ पुरस्कार हा डॉ.संजीव कुलकर्णी यांना, ललितगद्य याकरिता ताराबाई शिंदे पुरस्कार हा गणेश मनोहर कुलकर्णी यांना जाहीर करण्यात आला आहे. तर प्रथम प्रकाशन समीक्षा सौंदर्यशास्त्र या प्रकारातील रा.भा. पाटणकर पुरस्कारांकरिता शिफारस नसल्याचे मराठी भाषा मंत्री सामंत यांनी जाहीर केले. या पुरस्काराची रक्कम रूपये ५० हजार अशी आहे.

वाङ्मय पुरस्कार प्रकार सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार प्रकारात सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार हा अनुवादक योगिनी मांडवगणे यांना आल्बेर काम्यू ला मिथ द सिसीफ या पुस्तकासाठी जाहीर करण्यात आला असल्याचे मराठी मंत्र्यांनी घोषित केले. या पुरस्काराची रक्कम रूपये १ लाख अशी आहे. या दिमाखदार सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याचबरोबर २७ फेब्रुवारी रोजी नाशिक येथील कुसुमाग्रज यांच्या शिरवाड या गावाचे 'कवितांचे गाव' म्हणून उद्घाटन होणार असल्याचे मराठी भाषा मंत्री सामंत यांनी जाहीर केले. त्याचबरोबर रत्नागिरी येथील कवि केशवसूत यांच्या मालगुंड यास 'पुस्तकाचे गाव' करण्याच्या निर्णय घेतला असल्याचे मराठी भाषा मंत्र्यांनी जाहीर केले. कवितांचे गाव या संकल्पेनुसार शिरवाड गावातील ३५ घरांमध्ये वाचनालय निर्माण करून तेथे कवितांची पुस्तके ठेवण्यात येणार आहे आणि 'पुस्तकांचे गाव' या संकल्पेत गावातील ३५ घरांमध्ये प्रत्येक एक हजार नवी कोरी पुस्तके ही लहान मुले, युवक आणि प्रौढांसाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

# बोलता बोलता – यशस्वी निवेदनाची सूत्रे




**पुस्तक परीक्षण**

अस्मिता प्रदीप येंडे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सर्व प्राणिमात्रांमध्ये मानवाला बोलण्याचे वरदान लाभले आहे. मानव हा भाषेच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण करत असतो. बोलणं हा त्याचा स्वभाव असतो. हल्ली एक वाक्य सतत कानावर पडते, बोलून तर पहा. बोलण्याने बऱ्याच अवघड गोष्टी सोप्या होतात. म्हणजे बघा बोलल्याने व न बोलल्यानेसुद्धा बरेच गैरसमज निर्माण होत असतात. पण नुसत्या अर्थहीन बोलण्याला काही महत्त्व नसते. आपल्या बोलण्यात अर्थप्रवाह असेल, मुद्देसूद मांडणी असेल, उच्चार स्पष्ट असतील तर समोरील व्यक्तीला ऐकायला प्रसन्न वाटते. आपल्या बोलण्याच्या लयीत थोडा बदल झाला तरी त्याचे अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. म्हणून म्हणतात, बोलण्याआधी विचार करावा.


विविध स्तरावर विविध प्रकारचे कार्यक्रम संपन्न होतात, ते कार्यक्रम सूत्रबद्ध बोलण्यातून आकाराला येतात. कार्यक्रमातील वक्ते आणि रसिक प्रेक्षक यांच्यातील समांतर धागा म्हणजे निवेदक. निवेदन / सूत्रसंचालन याकडे आता करियरचा एक भाग म्हणून पाहिले जाते. निवेदन क्षेत्रात कार्य करताना कोणकोणती कौशल्ये आत्मसात करायला हवीत, निवेदनाची प्राथमिक सूत्र / माहिती, पूर्वतयारी याबद्दल कुठे शिकवण मिळत नाही. फक्त कागदावर लिहिलेले वाचायचे , त्यात एवढे काय असते, पण निवेदन वा सूत्रसंचालन हासुद्धा एक कलात्मक सादरीकरणाचा भाग आहे. अशाच निवेदन क्षेत्रात करियर घडवू इच्छिणाऱ्या तसेच शिक्षक , विद्यार्थी, डबिंग कलाकार, वृत्त निवेदक अशा सर्वांसाठी लेखक महेन्द्र कोंडे यांचे बोलता बोलता हा लेखसंग्रह निवेदन / सूत्रसंचालन करणाऱ्यांसाठी आदर्श मार्गदीप आहे. व्यास पब्लिकेशन हाउस प्रकाशित बोलता बोलता या पुस्तकाचे लेखक महेन्द्र कोंडे हे निवेदक, कवी, लेखक, जनसंपर्क अधिकारी अशा विविध भूमिका ते पार पाडत असतात. पुस्तक प्रकाशन सोहळा, गीतांचा कार्यक्रम, मुलाखत, परिसंवाद, पुरस्कार सोहळा अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांचे निवेदन करता करता लेखक अनुभवसंपन्न बनत गेले आणि जे अनुभव आपल्या गाठीशी आहेत, ते इतरांनाही सांगावे, या भावनेतून त्यांनी हे लेखन केले आहे. **(क्रमशः)**

# श्रीयश पॉलिटेक्निक येथे विभागीय खो खो सामने उत्साहात संपन्न



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश पॉलिटक्निक छत्रपती संभाजीनगरला ह्या वर्षीचे आंतर अभियांत्रिकी पदविका क्रीडा संघटनेच्या (आय ई डे सा) विभागस्तरीय खो खो स्पर्धेचे यजमानपद मिळाले होते. ह्या संघटनेद्वारे कबड्डी, खो खो, क्रिकेट, बुद्धिबळ, कॅरम अश्या विविध स्पर्धांचे विभागीय स्तरावर आयोजन केले जाते. त्याअंतर्गत दिनांक ३ ते ६ फेब्रुवारीला हे सामने आयोजित करण्यात आले. श्रीयश पॉलिटेक्निकचे प्राचार्य संदीप खंडागळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. ह्या सामन्यांमध्ये मराठवाड्यातून मुलांचे १४ तर मुलींचे १७ संघ समाविष्ठ झाले होते. शासकीय तंत्र निकेतन जालना संघाने मुलांमध्ये तर शासकीय तंत्रनिकेतन संभाजीनगर संघाने मुलींचे विजेतेपद प्राप्त केले. दोन्ही गटात श्रीयश पॉलिटेक्निक हे उपविजेते ठरले. हे विजेते संघ उच्चस्तरीय सामन्यांसाठी आता पात्र ठरले आहेत. यावेळी शिक्षक क्रीडा समन्वयक महेश जाधव यांनी काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष इंजी.बसवराज मंगरुळे यांनी विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच विभागीय कब्बडी स्पर्धेत श्रीयश पॉलिटेक्निक संघ उपविजेते ठरले.



# मी तुमचा राष्ट्रपती कसा होणार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**(मागील अंकावरून)**

१९३५ ते १९४१ दरम्यान अच्युतराव पटवर्धन यांनी युवकांसाठी शिबीरे आयोजित करून त्यांना समाजवादाचे शिक्षण दिले. १९३० ते १९४२ या बारा वर्षाच्या कालावधीत अच्युतराव यांना ८ वेळा झालेला तुरुंगवास जाज्वल देशप्रेमाचे ज्वलंत उदाहरण. त्यांच्या या तुरुंगवासामुळे संपूर्ण भारतभर युवा पिढीमध्ये स्वातंत्र्यलढ्यासाठी उत्साह निर्माण केला, कारण ते युवकांचे श्रध्दास्थान होते. भारतामध्ये आलेल्या क्रिप्स यांच्या सर्व योजना काँग्रेसने फेटाळल्या. मुस्लीम लीगने पाठपुरावा केलेला क्रिप्स यांचा प्रस्ताव काँग्रेसला मान्य नव्हता. क्रिप्स यांच्या भारत दौ-यापासूनच मुस्लीम लीग मार्फत बॅ. महमदअली जीना यांचा स्वतंत्र पाकिस्तान देश मागणीला काँग्रेसचा विरोध होता. दुस-या महायुद्धामध्ये भारताचा पाठींबा महत्वपूर्ण होता. महात्मा गांधीनी चलेजाव चळवळीचे रणशिंग फुंकले. अच्युतराव पटवर्धन हे आठ ऑगस्टच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील बैठकीस हजर होते. पण बैठक संपल्यावर घरी न येता ते भूमिगत झाले. अल्पावधीतच त्यांनी देशभर भूमिगत चळवळीची आखणी व बांधणी केली. भूमीगत चळवळीचे नेतृत्व त्यांनी जबरदस्त तडफदारपणे केले. भारत छोडो आंदोलनातील पहिल्या महिन्यातील जनतेचा प्रचंड उठाव ओसरल्यावर मनुष्यहत्या वगळून चावड्या जाळणे, सरकारी दप्तरे उध्वस्त करणे, युद्धसाहित्य नष्ट करणे, तारा तोडणे, रेल्वे उखडणे, पूल पाडणे आदि साबाटोज चे कार्यक्रम करून ब्रिटीशांच्या युध्दप्रयत्नांना खीळ घालण्याचा प्रयत्न करण्याचा निर्णय अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअल्ली, शिरुभाऊ लिमये, क्रांतिसिंह नाना पाटील आणि भूमिगत चळवळीच्या नेत्यांनी घेतला. त्याचवेळी जयप्रकाश नारायण हे हजारीबाग तुरूंग फोडून बाहेर आले आणि भूमीगत चळवळीस वेग आला. अच्युतराव वेष पालटून, नांव बदलुन देशभर फिरत होते. तरुणांना प्रेरणा देत होते आणि कार्यक्रमही देत होते. अच्युतराव यांना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने एक लाख रुपयांचे बक्षीस लावले होते. बंगालमध्ये मिदनापुर, संयुक्त प्रांतात वालिया आणि महाराष्ट्रात सातारा जिल्हा येथे नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रती सरकार उभारले गेले. अच्युतराव पटवर्धन यांनी सातारा जिल्ह्यातील क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली समांतर सरकार म्हणजेच प्रती सरकारच्या व्यापक चळवळीमध्ये स्वतःला झोकून दिले.



अच्युतराव पटवर्धन

साता-याचे समांतर सरकार ४४ महिन्यांच्या प्रदीर्घ काळासाठी प्रती सरकार होते. पत्री सरकार या नावाने ते जगभर प्रसिद्ध होते. ''पत्री'' हे लूटमार, देशद्रोही आणि समांतर सरकारमध्ये अडथळा आणण्याचे धाडस करणाऱ्या लोकांना देण्यात येणा-या शिक्षेचे नाव होते. सातारा जिल्हा म्हणजे पूर्वीचा सातारा आणि सांगली जिल्ह्याचा भाग. जवजवळ २० भागांमध्ये समांतर सरकार स्थापन झाले आणि प्रभावीपणे चालवले गेले. जवळजवळ ५०० गावे ब्रिटिश साम्राज्यापासून खरोखरच मुक्त झाली. स्वतंत्र लोक न्यायालये आयोजित केली गेली. गरीब शेतकरी, शेतमजूर, आणि सर्व जातीच्या स्त्रीयांना मदत, सावकारांकडून जादा व्याजदर आकारणीवर बंदी अशा प्रकारच्या निर्णयांमुळे प्रती-सरकारची लोकप्रियता सामान्य लोकांच्या मनात निर्माण झाली.अच्युतरावांनी या चळवळीत कार्यकर्त्यांचे कपडे धुणे, जेवण बनवून देणे यासह मार्गदर्शन करणे याप्रकारचे कार्य केले. ९ ऑगस्ट १९४६ रोजी भूमिगत अवस्था संपवून ते पुण्यात प्रकट झाले. तरुणांच्या मनातील स्वातंत्र्याची ज्वाला अधिकाधिक तीव्र झाली पाहिजे यासाठी आयुष्य वेचणाऱ्या अच्युतराव पटवर्धन यांची भव्य मिरवणूक पुण्यात काढण्यात आली. त्यांच्या स्वागताचा सोहळा दारूवाला पुलाजवळील समर्थ व्यायाम मंदीरात औंध संस्थानचे राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अफाट जनसमुदाय आपल्या आवडत्या नेत्याला पहाण्यासाठी लोटला होता. अच्युतराव,नाना पाटील आणि अरुणा असफ अली प्रगट झाल्यापासून त्यांना पाहण्यासाठी आणि त्यांची भाषणे ऐकण्यासाठी जनसंमुदाय उफाळून येई. १९४६ ते १९५० या कालखंडात अच्युतराव पटवर्धन समाजवादी पक्षाचे इंग्रजीतील साप्ताहिक व मुखपत्र जनता याचे संपादक होते. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींच्या हत्येनंतर शनिवार वाड्यासमोर झालेली अभूतपूर्व श्रध्दांजली सभा डोळ्यासमोर येते, असे एस.एम. जोशी यांनी लिहून ठेवले आहे. या सभेस माणसे मुंग्यांसारखी जमली होती. गर्दी आवरणे जवळ जवळ अशक्य होते. त्यावेळी कोणी कोणाचे ऐकेना. तेंव्हा अच्युतराव उठून उभे राहिले व मोठ्या दुःखाने म्हणाले, ''तुमचा बाप मेला तर असेच वागाल का?'' या वाक्याबरोबर लक्षावधी लोकांची ती सभा टाचणी पडली तरी ऐकू जाईल अशी स्तब्ध झाली. १९५० नंतर रावसाहेब पटवर्धनांच्या सीताराम बंगल्यात जयप्रकाशजी नारायण, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, दादा धर्माधिकारी, शंकरराव देव, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी यांच्या व इतरांच्या चर्चा तरुण पिढीला मार्गदर्शक असत. या बंगल्यात अध्यात्मापासून राजकारणापर्यंत व पुण्यातल्या गल्लीपासून दिल्लीपर्यत सा-या जगाच्या गप्पा होत असत. १९५२ मध्ये अच्युतराव पटवर्धन राजकारणातून निवृत्त झाले. देशपातळीवरील आणि महाराष्ट्र पातळीवरील सर्व राजकीय पदे त्यांनी नाकारली. लाल बहादूर शास्त्री यांनी पंतप्रधान झाल्यावर आवर्जुन अच्युतरावांना नियोजन आयोगात बोलविले. त्यावेळी अच्युतरावांनी ही विनंती अमान्य केली. जनता पक्षाचा विजय झाल्यावर अच्युतरावांचे नाव राष्ट्रपती पदासाठी सुचविण्यात आले. त्यावेळीही मी अंहिसेला बांधलेला. मी तुमचा राष्ट्रपती कसा होणार म्हणून अच्युतरावांनी राष्ट्रपतीपदाची उमेदवारी नाकारली. प्रख्यात तत्वचिंतक कृष्णमूर्तींच्या निकटवर्तीयांपैकी अच्युतराव पटवर्धन हे एक होते. त्यामुळेच १९५३ पासून ते कृष्णमूर्तींच्या न्यू एज्युकेशन फौंडेशन चे काम करू लागले. त्यांनी अनेक अभिनव शैक्षणीक आणि शेती संशोधनाचे प्रयोग केले. मध्यंतरीच्या काळात कित्येक वर्षे अच्युतराव वाराणशीला राहिले. त्यांनी भगवे वस्त्र धारण केले नाही. काशीला राहून कित्येक वर्षे चिंतन मनन करीत विचारधन जनतेला देत त्यांनी काळ काढला. हरीव्दार येथे पवित्र गंगेच्या काठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभा आहे त्याचे अनावरण त्यांच्या हस्ते झाले. बनारस हिंदू विद्यापीठात दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून केलेले अच्युतरावांचे भाषण शैक्षणिक जगतात खूप गाजले. ज्येष्ठ विचारवंत आणि समाजसेवक अच्युतराव पटवर्धन यांनी लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्ट्रतर्फे दिला जाणार लोकमान्य टिळ सन्मान पारितोषिक पुरस्कार मात्र १ ऑगस्ट १९८७ रोजी म्हणजे त्यांच्या ८२ व्या वर्षी स्वीकारला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते व जयंतराव टिळक यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यापूर्वी हा पुरस्कार सर्वश्री एस. एम. जोशी, श्रीमती गोदावरी परुळेकर, श्रीमती इंदिरा गांधी (मरणोत्तर) आणि श्रीपाद अमृत डांगे यांना देण्यात आला होता. ''आयुष्यभर निस्वार्थी भावनने समाजसेवा करणाऱ्या व्यक्तीला लोकमान्य टिळक सन्मान पारितोषिक देण्यात येते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या समाजावर सुसंस्कार करण्यासाठी आयुष्यभर काम करणाऱ्या अच्युतराव कोल्हटकर यांचे ५ ऑगस्ट १९९२ रोजी



शिरीष चिटणीस

वृरदापकाळाने निधन झाले.

अच्युतराव पटवर्धन आणि अरुणा असफअल्ली यांना भारतातच नव्हे तर जगभर प्रसिध्दी मिळत राहिली. जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया, अरुणाबाई, आणि अच्युतराव हे समाजवादी आंदोलनामधून पुढे आलेले नेते होते. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळीच्या दृष्टीने देखील विशेष महत्व होते. छोडो भारत चळवळीला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने विरोध करून ते मित्रराष्ट्रांच्या बाजूने उभे राहिले होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळीला जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया, आचार्य नरेंद्र देव, मेहर अली आणि अरुणा असफअल्ली यांच्याबद्दल छोडो भारत चळवळीमध्ये नेतृत्व केल्याबद्दल विशेष आपुलकी वाटायची. १९५० नंतर १९६६ पर्यंत सेंट्रल हिंदू कॉलेजमध्ये पुन्हा प्राध्यापक म्हणून अच्युतराव यांनी काम केले. त्यानंतर त्यांनी पुण्यात संपूर्ण एकांत आणि निवृत्त जीवन व्यतीत केले. सार्वजनिक जीवन टाळून तसेच पत्रव्यवहारालाही प्रतिसाद न देता क्वचित प्रसंगी आपली उपस्थिती दाखवित त्यांनी आयुष्य व्यतीत केले. त्यांचे जीवन आणि कार्य, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान आणि समाजवादी विचारसरणीच्या प्रचारासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे महत्वपूर्ण ठरते.

****

# फेसबुकचा वाढदिवस !

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला ४ फेब्रुवारी रोजी २१ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या दोनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक



लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २१ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास बारा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. फेसबुकला २१ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मुलांची अति चिंता नको.....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजच्या या स्पर्धेत युगात माझ्या पाल्याचे कसे होईल ? अशा प्रकारची चिंता किंवा भीती सर्वच पालकांना सतावत असते.कारण सगळ्याच क्षेत्रात म्हणजे अगदी लहान गटात प्रवेश मिळण्यापासून ते शिक्षण घेऊन नोकरी ,व्यवसाय,उद्योग करेपर्यंतच्या प्रवासात वाढलेली प्रचंड स्पर्धा.यात आपला पाल्य कुठे टिकेल का ? तो यशस्वी होईल का? त्याचे काय होईल ? अशी चिंता न करता आपल्या पाल्याला सक्षम करण्यासाठी आपण काय करु शकतो यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे.

प्रत्येकाला जन्मतःच काही ना काही नैसर्गिक शक्ती, सामर्थ्य व कौशल्ये उपजत मिळालेली असते. त्याच्या जोरावर व्यक्ती पुढील आयुष्यात कष्ट, सराव, सातत्याने प्रयत्न केल्याने यशस्वी होतो.

जर तुमच्या पाल्याला आयुष्यात चांगले करिअर घडवायचे असेल तर त्याला पूरक वातावरण देणे हे पालक म्हणून तुमच्या हातात आहे. अभ्यासाची मेहनत करणं त्याचं काम आहे. त्याची आवड आणि कल पाहून शिक्षणाची दिशा ठरवा.त्याच्या आवडीच्या क्षेत्रात जाण्यासाठी त्याला प्रेरित करा.त्याला प्रोत्साहन द्या. त्याचे मनोबल वाढवा. पालक म्हणून प्रत्येक यश-अपयशाच्या वेळी त्याच्या पाठीशी ठामपणे उभे रहा. त्याला विश्वास द्या. एक दिवस तुमचा पाल्य नक्कीच या जगात चमकलेला असेल आणि तो ही स्वतःच्या कर्तृत्वावर.

यासाठी खालील बाबींकडे लक्ष द्या.

१.आपल्या पाल्याला सर्व प्रथम माणसं ओळखायला शिकवा.

२.पाल्याची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास याबरोबर व्यावहारिक ज्ञान, कौशल्य कसे वाढेल याकडे लक्ष द्या.

३.मुलांना सतत सांगणे, ऐकवणे यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करा.

४.मुलांना मानसिकदृष्ट्या कणखर आणि सक्षम बनवा. परिस्थिती कितीही बिकट असेल तरी स्थिर रहायला शिकवा.

५.मोठयांचा आदर करण्याबरोबरच माणसे जोडण्याची कला शिकवा.

६.हाती घेतलेले कोणतेही काम मनापासून आणि आवडीने करण्याची सवय लावा.

७.मान-अपमानाचे प्रसंग पचविण्याची क्षमता निर्माण करा. ते एक उत्तम जीवन शिक्षण आहे.

८.अनावश्यक गोष्टीत वेळ वाया घालविण्यापेक्षा स्वतःला समृद्ध करणाऱ्या गोष्टीत रस घ्यायला शिकवा.


९.संयमाने वेगवेगळ्या प्रसंगांना तोंड देऊन आपली निर्णयक्षमता कशी विकसित करता येईल याचे अनुभवशिक्षण द्या.

१०.प्रचंड कष्ट करण्याची तयारी ठेवण्याचा कानमंत्र द्या.

११.आपल्या पाल्याची इतर मुलांशी तुलना करु नका.

१२.सकारात्मक विचारांची ज्योत आपल्या पाल्याच्या मनात सतत तेवत ठेवा.

***



**विद्यार्थ्यांशी हितगुज**
**लक्ष्मण जगताप,**
**बारामती**
संपर्क : ९४२३२ ४९९९६







हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559